लोकमत


## विजया रहाटकर : देवगड येथे महिला बचत गट प्रशिक्षण कार्यक्रम

# महिलांनी उद्योजक बनावे

लोकमत न्यूज नेटवर्क

नेवासा : महिलांचे न्याय्य हक्क, त्यांना निर्णय प्रक्रियेत योग्य स्थान देण्यासाठी महिला आयोग पाठिशी आहे. महिला बचत गटांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन उद्योजक बनण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केले.

श्री क्षेत्र देवगड (ता. नेवासा) येथील सभागृहात झालेल्या महिला बचत गटांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन राज्य महिला आयोग व राज्य शासन यांच्या वतीने प्रज्ज्वला योजनेंतर्गत करण्यात आले होते. आमदार बाळासाहेब मुरकुटे




राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी देवगड येथे महिला बचत गटांच्या प्रशिक्षण कार्यक्रमात मार्गदर्शन केले.

अध्यक्षस्थानी होते. महिला आयोगाचे जिल्हा समन्वयक डॉ. राजेंद्र आंधळकर, महिला बचत गटाच्या मार्गदर्शक आशा मुरकुटे, गटविकास अधिकारी अनंत परदेशी,नगराध्यक्षा संगीता बर्डे, शिवसेनेच्या महिला आघाडी प्रमुख पूजा ताकटे, नगरसेवक सुनील वाघ, नगरसेविका डॉ. निर्मला सांगळे, नगरसेविका अनिता डोकडे, नीता वाघ, भारती बेदरे, माधुरी कुलकर्णी, बालविकास प्रकल्प अधिकारी सुनील अंकुश, देवगडचे सरपंच अजय साबळे व्यासपीठावर होते.

आमदार मुरकुटे म्हणाले, बचत गटांच्या माध्यमातून महिला सक्षम झाल्या पाहिजेत. यासाठी केंद्र व राज्य शासन प्रयत्न करत आहे. त्यासाठी अनेक हितावह योजना सरकार राबवत आहे. महिलांना बचत गटांच्या माध्यमातून उभारी मिळावी. बचत गटांतील महिलांचा उत्कर्ष व्हावा हाच उद्देश शासनाचा आहे. प्रशिक्षण कार्यक्रमाद्वारे महिला बचत गटांमध्ये नवचैतन्य प्राप्त होईल, असे त्यांनी सांगितले. महिला आयोगाचे जिल्हा समन्वयक डॉ. राजेंद्र आंधळकर यांनी महिला बचत गटांच्या सदस्यांचे स्वागत करुन प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन सुधीर चव्हाण यांनी केले. विकास जाधव यांनी आभार मानले.

Ahmednagar Main
Page No. 4 Jul 19, 2019
Powered by: erelego.com

# शहरातील बचत गटांसाठी मनपाचे कार्य गौरवास्पद

## विजया रहाटकर; 'शहरी उपजीविका' अंतर्गत महिलांना प्रशिक्षण

**नगर : प्रतिनिधी**

बचत गटांचे कार्य मोठ्या प्रमाणात सुरू आहे. नगर महापालिकेने सर्वप्रथम महिला बचत गटासाठी शहरी उपजिवीका केंद्राची स्थापना केली. या माध्यमातून महिला बचत गटांमार्फत निर्मिती झालेल्या वस्तुंना हक्काची बाजारपेठ मिळवून देण्याचे काम मनपाने केले आहे. मनपाचे हे कार्य गौरवास्पद असल्याचे प्रतिपादन महिला आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती विजया रहाटकर यांनी केले.

अग्निशमन केंद्राजवळील राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियानांतर्गत शहरी उपजिवीका केंद्र असून हे केंद्र शहरातील बचत गटातील महिलांनी तयार केलेल्या वस्तूंचे विक्री व प्रदर्शन केंद्र आहे. या केंद्राचे उद्घाटनश्रीमती रहाटकर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर माऊली सभागृहात महिला बचत गटांसाठी प्रज्वला योजनेअंतर्गत आयोजित प्रशिक्षण शिबीरावेळी त्या बोलत होत्या.



**नगर : महिला बचत गटांच्या प्रदर्शनाची पाहणी करतांना महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर, उपमहापौर मालन ढोणे, आयुक्त श्रीकृष्ण भालसिंग, उपायुक्त सुनील पवार आदी.** (छाया : समीर मन्यार)

यावेळी माजी खासदार दिलीप गांधी, आयुक्त श्रीकृष्ण भालसिंग, सरला बाबासाहेब वाकळे, उपमहापौर मालन ढोणे, सभागृह नेते स्वप्नील शिंदे, मबाक समिती सभापती लता शेळके, उपसभापती सुवर्णा गेनप्पा, नगरसेविका सोनाली चितळे, उपायुक्त सुनिल पवार आदी उपस्थित होते.

रहाटकर म्हणाल्या की, राज्यात ३ लाख बचत गट असून सुमारे ६० लाख महिला सदस्या आहेत. मात्र, राज्यात नगर जिल्हा सर्वात अ‍ॅक्टीव्ह जिल्हा आहे. महापालिकेकडून बचतगटांसाठी मोठे काम करण्यात आले आहे. महिलांच्या सर्वांगिण विकासाचा संकल्प घेऊन रहाटकर यांनी काम सुरू केले आहे. त्यांनी त्यांच्या कार्याच्या माध्यमातून सामान्य महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला आहे. उपजिविका केंद्राचे कर्मचारी नानासाहेब बेलेकर यांनी या कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.

सकाळ

# महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणावर भर

## विजया रहाटकर; महिला आयोगातर्फे पाथर्डी येथे प्रशिक्षण

**पाथर्डी, ता. १८ :** ''महिलांचे आर्थिक सक्षमीकरण व त्यांच्यात कायद्याविषयीची जाणीव प्रगल्भ करण्याचे काम करीत आहोत. जनधन योजनेतील बँक खात्यात बचतगटांच्या महिलांनी एक लाख कोटींची बचत केली. प्रगतीच्या दिशेने चाललेली घोडदौड पुढेही सुरू राहील,'' असा विश्वास महिला आयोगाच्या राष्ट्रीय अध्यक्ष विजया रहाटकर यांनी व्यक्त केला.



**पाथर्डी : प्रज्वला योजनेच्या प्रशिक्षणात बोलताना महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर.**

राज्य सरकार व राज्य महिला आयोग यांच्यातर्फे आप्पासाहेब राजळे बहुउद्देशीय सभागृहात प्रज्वला योजनेतून बचतगटांना प्रशिक्षण देण्यात आले. त्याच्या उद्‌घाटनप्रसंगी रहाटकर बोलत होत्या. आमदार मोनिका राजळे, जिल्हा परिषद सदस्य ललिता शिरसाट, संध्या आठरे, पंचायत समिती सभापती चंद्रकला खेडकर, नगरसेविका मंगल कोकटे, डॉ. शारदा गर्जे, मनीषा वायकर, काशीबाई गोल्हार, सुनीता दौंड आदी उपस्थित होत्या.

रहाटकर म्हणाल्या, ''महिलांमध्ये कायद्याविषयीची जागृती अतिशय महत्त्वाची आहे. बचतगटांच्या माध्यमातून महिलांना बचतीची सवय लागली. संघटित राहिल्याने महिलांची प्रगती वेगाने होत आहे. सरकारच्या महिलांसाठी अनेक योजना असून, त्यांचा महिलांना आधार वाटला पाहिजे. राज्यातील साडेतीन हजार महाविद्यालयांतून प्रशिक्षण देऊन महिलांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याचे काम आयोगाने केले आहे.''

आमदार राजळे यांनी, महिलांच्या कार्यात भाजप सर्वार्थाने मदतीची भूमिका बजावीत असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन राजू सुरवसे यांनी केले.

Nagar, Main
19/07/2019 Page No. 2

अॅग्रोवन

# राज्य आयोग महिलांचे दुसरे माहेर

## विजया रहाटकर; कर्जत येथे महिला बचत गट प्रशिक्षण कार्यशाळा

**नगर (प्रतिनिधी) :** ''महिला राज्य आयोग हे महिलांचे हक्काचे दुसरे माहेर आहे. संकटे आणि अडचणींतून मार्ग काढण्यासाठी सेतूचे काम करते. महिलांच्या हक्क आणि संरक्षणासाठी अनेक कायदे आहेत. मात्र, त्याबाबत जागृती आणि जाणीव होणे गरजेचे आहे,'' असे प्रतिपादन राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केले.

राज्य महिला आयोग आणि राज्य सरकारच्या प्रज्ज्वला योजनेअंतर्गत पंचायत समितीच्या विद्यमाने महिला बचतगट प्रशिक्षण कार्यशाळेत प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या.

पालकमंत्री राम शिंदे, सदस्यत्व नोंदणीचे जिल्हाप्रमुख प्रसाद ढोकरीकर, तालुकाध्यक्ष अशोक खेडकर, सभापती साधना कदम, उपसभापती प्रशांत बुद्धिवंत, माजी सभापती महानंदा आंधळकर, प्रज्वला समितीच्या सदस्य उषा वाजपेयी व उषा खापरे, डॉ. कांचन खेत्रे, अशा वडे, आशा क्षीरसागर, कांतिलाल घोडके, प्रांत अर्चना नष्टे, तहसीलदार छगन वाघ, गटविकास अधिकारी मुकुंद पाटील, कृष्णा काळे, सुजाता झरेकर, शिवाजी नवले उपस्थित होते.

राम शिंदे म्हणाले, ''प्रत्येक क्षेत्रात महिला पुरुषांच्या बरोबरीने यश मिळवितात. महिलांनी त्यांचे हक्क, अधिकार आणि कायदे समजून घेणे आवश्यक आहे. त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे.''

> **“ महिला बचतगट उत्पादने, शेतीसह विविध प्रकारांत अग्रेसर आहेत. मात्र, उत्पादित केलेले पदार्थ किंवा वस्तू 'जेथे पिकते तेथे विकत नाही' या उक्तीप्रमाणे योग्य दरात विकल्या जात नाहीत. त्यांना बाजारपेठ मिळवून देण्याचे काम राज्य महिला आयोगाच्या सहकार्यातून प्रज्ज्वला योजनेत केले जाईल.**
>
> – **विजया रहाटकर**, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष